पुण्यनगरी दि. १७/०६/२०२४

# खुनाच्या गुन्ह्यातील दोन अज्ञात आरोपी १८ तासांत जेरबंद

**नांदेड :** शहरातील हरुन बाग इस्लामपुरा येथे शनिवार दि. १५ जून रोजी रात्री एका तरुणाच्या डोक्यात धारदार हत्याराने मारुन गंभीर जखमी केले. यात त्याचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपींना इतवारा पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाला १८ तासांच्या आत जेरबंद करण्यात यश आले आहे.



नांदेड शहरातील हरुन बाग इस्लामपुरा येथे अब्दुल मन्सुर अब्दुल रहीम (३७) यांचे डोक्यात मागच्या बाजूला धारदार हत्याराने मारुन गंभीर जखमी केले. यात त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. या गुन्ह्यात आरोपीने वापरलेले शस्त्र गंभीर स्वरुपाचे होते. त्यामुळे पोलिसांपुढे आरोपी शोधण्याचे आव्हान होते. घटनास्थळी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी भेट देऊन या गुन्ह्याचा शोध घेण्याचे आदेश दिले होते. यानंतर पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अविनाशकुमार, खंडेराय धरणे, उप विभागिय पोलीस अधिकारी सुशिलकुमार नायक, पोलीस निरीक्षक रणजित भोईटे यांच्या मार्गदर्शनाखाली इतवारा पोलीस गुन्हे शोध पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक जाधव, पोउपनि विलास पवार, सपोउपनि डी. व्ही. बिसाडे, जमादार मोहन हाके, जमादार ईमरान, शेख मोकले, पोना हवीव चाऊस, पोना कोमुलवार, पोना दासरवाड, पोकॉ कोरनुळे, पोकॉ गायकवाड, पोकॉ जगताप यांच्या पथकाने तपासचक्रे वेगाने फिरवत १८ तासाच्या आत संशयित आरोपी फैजलखान आरेफखान(२५, पाण्याच्या टाकीजवळ चौफाळा, नांदेड), खाजाखान उर्फ बाबु ताहेरखान (३०, रा.रंगारगल्ली, नांदेड ) यांना ताब्यात घेतले आहे.